मगल कार्यालय येथे अ. भा.

# डॉ.जे.जे.मगदूम फार्मसी कॉलेजमध्ये रोजगार कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :** डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथील ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेल व महिंद्रा प्राइड क्लासरूम्स - नंदी फाउंडेशन यांच्या तर्फे सीएसआयआर फंड या अंतर्गत विद्यार्थिनिंसाठी रोजगार कौशल्ये या विषयावर सात दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थिनींची करिअर तयारी व व्यावसायिक क्षमता वाढवणे हा होता.

उद्योग जगतातील बदलत्या मागण्या लक्षात घेऊन विद्यार्थिनींना सॉफ्ट स्किल्स, संवादकौशल्य, मुलाखतीची तयारी, रिझ्युमे लेखन, व्यक्तिमत्व विकास, टीमवर्क आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या सात दिवसांच्या प्रशिक्षणातून विद्यार्थिनींना रोजगार बाजारपेठेतील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेली तयारी करवून घेण्यात आली. उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा समजून घेऊन त्यानुसार स्वतःला घडविण्याची संधी या उपक्रमामुळे मिळाली.

या प्रशिक्षणासाठी महिंद्रा प्राइड क्लासरूम्स - नंदी फाउंडेशन चे तज्ज्ञ प्रशिक्षक विनय विलास भोसले, लुईस पी. शेळके व योगेश चव्हाण ह्या प्रशिक्षकांनी विद्यार्थिनींना व्यावहारिक अनुभव देण्यासाठी परस्परसंवादी सत्रे, गट चर्चा आणि मुलाखती घेतल्या. उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आवश्यक आत्मविश्वास, व्यावसायिकता आणि योग्य दृष्टिकोन विद्यार्थिनींमध्ये रुजविणे मदत झाली.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शीतलकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम व व्हाईस चेअरपर्सन अॅड. डॉ. सोनाली मगदूम यांनी विद्यार्थिनींना शुभेच्छा देत या प्रकारचे प्रशिक्षण त्यांना व्यावसायिक जीवनात निश्चितच उपयोगी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.या प्रशिक्षणा चे आयोजन महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. विनोद पाटील व प्रा. अक्षय पाटील यांनी केले.